विषय :- मळीपासून मद्यार्क/ ऊसाच्या रसापासून मद्यार्क/ जलरहित मद्यार्क निर्मिती धोरण

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन निर्णय क्र. बीपीए-११०२/सीआर-१०/इएक्ससी-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,   दिनांक : १० जुलै, २००३

<u>शासन निर्णय :-</u> राज्यात मळीपासून मद्यार्क तयार करण्यासाठी महाराष्ट्र डिस्टीलेशन ऑफ स्पिरीट ॲन्ड मॅन्युफॅक्चर ऑफ पोटेबल लिकर रुल्स, १९६६ च्या नियमातील तरतुदीनुसार आसवनीसाठी नमुना "आय" अनुज्ञप्ती देण्यात येते. परंतु, ही अनुज्ञप्ती कोणत्या प्रकारच्या कारखान्याना देण्यात यावी, याबाबत नियमात कोणत्याही प्रकारे तरतूद नाही. यापूर्वी आसवनी अनुज्ञप्ती देण्यासाठी केंद्र शासनाचे निर्बन्ध होते. परंतु, हे निर्बन्ध केंद्र शासनाने दिनांक १७.६.१९९३ पासून उठविले आहेत. त्याचप्रमाणे, केंद्र शासन विरुध्द बिहार डिस्टीलरी या मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणी दिनाक २७.१.१९९७ रोजी निवाडा देताना मा.सर्वोच्च न्यायालयाने असे निदेश दिले की, औद्योगिक मद्यार्क निर्मितीचा भाग हा केंद्र शासनाच्या नियंत्रणात असेल आणि पेय मद्य निर्मितीची बाब ही राज्य शासनाच्या नियंत्रणात असेल असे नमूद केले. त्याचप्रमाणे वेळोवेळी केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या आसवन्या अनुज्ञप्त्या देण्याच्या धोरणाबाबत बदल होत गेला. परंतु, हे बदल एकत्रितरित्या लिखित स्वरुपाचे नव्हते. त्यामुळे धोरणात संदिग्धता रहात होती. ही संदिग्धता राहू नये म्हणून लिखित स्वरुपाचे धोरण जाहीर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

त्याचप्रमाणे मळीप्रमाणे ऊसाच्या रसापासून सुध्दा मद्यार्कांची निर्मिती करता येऊ शकते. त्यासाठी आसवनी प्रकल्पात अल्पसे बदल करणे आवश्यक असते. तसेच पेट्रोलमध्ये काही प्रमाणात मद्यार्कांचे मिश्रण करुन मोटार वाहन इंधन म्हणून वापर करण्याचे प्रयोग यशस्वी झाल्यामुळे केंद्र शासनाने १ जानेवारी, २००३ पासून देशातील नऊ राज्यात व चार केंद्रशासित प्रदेशात ५% मद्यार्क पेट्रोलमध्ये टाकून त्याचा मोटार वाहन इंधन म्हणून वापर करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे जलरहित मद्यार्क निर्मिती करण्यासाठी परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावानुसार शासनाने आता वरीलप्रमाणे मद्यार्क निर्मितीसाठी आसवनी अनुज्ञप्ती मंजूर करण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत :-

(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना मळीपासून औद्योगिक तथा पेय मद्य निर्मितीसाठी मद्यार्कांची निर्मिती व विक्री करण्यास आसवनी अनुज्ञप्त्या प्राधान्याने देण्याचे प्रचलित धोरण विनाबदल यापुढेही चालू ठेवण्यात यावे.

(२) साखर कारखाने नसणा-या पण मळीपासून फक्त औद्योगिक मद्यार्कांचे उत्पादन करु इच्छिणा-या घटकांना औद्योगिक मद्यार्कांचे उत्पादन करुन केवळ स्वतःच्या औद्योगिक प्रयोजनार्थ वापरण्यासाठी आसवनी अनुज्ञप्ती मंजूर करण्याचे सध्याचे धोरण यापुढेही चालू ठेवण्यात यावे.

(३) राज्यातील खाजगी साखर कारखान्यांना मळीपासून औद्योगिक तथा पेय मद्य निर्मितीसाठी मद्यार्कांची निर्मिती व विक्री करिता आसवनी अनुज्ञप्त्या मंजूर करण्यात याव्यात.

(४) राज्यातील आसवनीधारक सहकारी/खाजगी क्षेत्रातील साखर कारखान्यांनी मागणी केल्यास त्यांना ऊसाच्या रसापासून मद्यार्क निर्मितीस परवानगी देण्यात यावी. मात्र राज्यात जेव्हा साखरेचा तुटवडा निर्माण होईल तेव्हा अशा साखर कारखानदारांना साखरेची निर्मिती करणे बंधनकारक राहील.

(५) ज्या घटकाकडे स्वत:चे साखर कारखाने आहेत, अशा घटकांनाच ऊसाच्या रसापासून मद्यार्क निर्मितीची परवानगी देण्यात यावी. मात्र ज्या घटकाकडे स्वत:चे साखर कारखाने नाहीत अशा घटकांना /आसवन्यांना अशी परवानगी देण्यात येऊ नये.

(६) आसवनी असलेल्या सहकारी / खाजगी साखर कारखान्यांना प्राधान्याने जलरहित मद्यार्क निर्मितीसाठी अनुज्ञप्ती देण्यात यावी.

(७) आसवनी विरहित खाजगी घटकांना राज्यातून मद्यार्क खरेदी करुन जलरहित मद्यार्क निर्माण करण्यासाठी अनुज्ञप्ती देण्यात यावी.

औद्योगिक मद्यार्कासाठी आसवनी उभारणीकरिता केंद्र शासनाच्या "IEM" ची आवश्यकता राहील. अनुक्रमांक (४) येथील बाबीकरिता दरवर्षी वर्षाच्या सुरुवातीस साखर आयुक्तांचे "ना-हरकत" प्रमाण पत्र आवश्यक राहील. तसेच इतर प्रचलित बाबी उदा. प्रकल्प अहवाल, स्थानिक प्राधिकरणाचा "ना हरकत" दाखला, संचालकाचा पूर्ण पूर्व चारित्र्यविषयक पोलीस अहवाल या बाबी कायम राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ना. ड. पैराळ)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

(१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(२) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
(३) सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
(४) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
(५) सर्व जिल्हाधिकारी.
(६) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
(७) निवडनस्ती इएक्ससी-३.

एच-396(1000-7-03)